दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com vadalvartanews@gmail.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रविवार १६ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३०८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# भुजबळांनी खासगीत म्हटले होते: तिकडे साठमारी होत आहे.काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा गौप्यस्फोट

## काय म्हणाले विजय वडेट्टीवार

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, छगन भुजबळ पक्षात वरिष्ठ असताना डावलले गेले. कारण तिकडे साठमारी होत आहे. त्यांच्या पक्षात ज्यांना जे मिळेत ते ते ओरबडून खाल्ले जात आहे. राज्यातील सरकार कमिशन खोर सरकार झाले आहे. त्यांनी खरेदीचा सपाटा लावला आहे. छगन भुजबळ साहेबांची अजित पवार यांच्याबरोबर जाण्याची इच्छा नव्हती. ते खासगीरित्या बोलले होते. आज त्यांच्यावर अन्याय होत असेल तर त्यांनी त्यांच्या भुजांमधील बळ दाखवावेत. तू मारल्यासारखे कर, मी रडल्यासारखे करतो, असे करण्यात काहीच अर्थ नाही. आता एक तुकडा दोन घाव त्यांनी करावे. त्यांच्याकडून आम्हाला ती अपेक्षा आहे. अंगावर आले म्हणून शिंगावर घेणार व्यक्ती ते आहे. परंतु आता कुरकुर करतात. ही अपेक्षा त्यांच्याकडून नाही.

## राज्यातील सरकार कमिशन खोर सरकार झाले आहे-विजय वडेट्टीवार





लोकसभा निवडणुकीनंतर राज्यातील राजकारणात शांतता निर्माण होईल, अशी अपेक्षा होती. परंतु राज्यसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामधील नाराजीनाट्याची चर्चा सुरु झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांची लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा होती. परंतु महायुतीमधील वादामुळे ते शक्य झाले नाही. त्यानंतर राज्यसभेची पोटनिवडणुकीसाठी त्यांनी आपली इच्छा जाहीरपणे व्यक्त केली. त्यावेळी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना उमेदवारी दिली गेली. त्यामुळे भुजबळ नाराज झाले. भुजबळ यांनी 'टीव्ही 9 मराठी'ला शुक्रवारी 'रोखठोक' मुलाखत दिली होती. 'टीव्ही 9 मराठी'चे मॅनेजिंग एडिटर उमेश कुमावत यांनी घेतलेल्या मुलाखतीत त्यांनी अनेक गौप्यस्फोट केले. त्याचे पडसाद दुसऱ्या दिवशी उमटले. काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवर यांनी छगन भुजबळ यांच्यासंदर्भात गौप्यस्फोट केला. त्यांची राष्ट्रवादी अजित पवार गटात जाण्याची इच्छाच नव्हती, असे त्यांनी आपणास खासगीत सांगितल्याचा दावा केला. दबावामुळे भुजबळ गेले... भुजबळ दबावामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. तेच नाही तर अनेक जण असे म्हणतात. भुजबळ तर शेवटच्या टप्प्यात गेले. त्यांची इच्छा नव्हती. परंतु तपास संस्थांच्या दबाव आणून अनेकांना नेण्यात आले. आता भुजबळांनी तेथेच राहावे. अजित पवार यांनी तेथेच भाजपसोबत राहावे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता त्यांच्याकडून सत्ता काढून आम्हाला देईल, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.

## पाटोदा न्यायालयाच्या परिसरात न्यायाधीशांच्या हस्ते वृक्षारोपण



पर्यावरणाचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. झाडे हवेतील कार्बनडाय ऑक्साइड शोवून शुद्ध ऑक्सिजन निर्माण करतात हे उद्दिष्ट पुढे ठेवून दिनांक १४ जून २०२४ रोजी पाटोदा न्यायालय परिसरामध्ये पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या यायाधीश श्रीमती ए.ए. पाटील मॅडम यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पाटोदा न्यायालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले यावेळी पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष अड. सुशील कोठेकर, सचिव अड. सचिन जावळे साहेब, उपाध्यक्ष अड. सुधीर घुमरे साहेब, अड. जगदाळे साहेब, अड अमरिश वैद्य साहेब, अड. थोरवे साहेब, अड.बी. बी. जावळे साहेब,ऋ सहाय्यक सरकारी वकील अड. पांडव साहेब, अड. तळेकर साहेब, अड. विलास पवार साहेब इत्यादी विधिज्ञ तसेच पाटोदा न्यायालयाचे कुलकर्णी साहेब, धन्वे साहेब, गाडे साहेब, आशोक जाधव साहेब, आर्सुळ, पुजा वाघमारे ईत्यादी सह सर्व न्यायालयीन कर्मचारी, अंमळनेर पोलिस स्टेशनचे येवले साहेब व पक्षकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## लोकनेते जयदत्त अण्णा क्षीरसागर साहेबांच्या कार्यकर्ता मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहा.

### सौ महानंदा भारत बहिर .



रायमोहा (प्रतिनिधी) उद्या दिनांक 16 जून रविवार सकाळी 11.00 वाजता आशिर्वाद लॉन्स बार्शी रोड बीड या ठिकाणी लोकनेते जयदत्त अण्णा क्षीरसागर मित्र मंडळाच्या वतीने कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.तरी बीड विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या मेळाव्याला उपस्थित राहावे. लोकनेते जयदत्त अण्णा क्षीरसागर यांना विजयी करण्याचा संकल्प या मेळाव्याच्या माध्यमातून करण्याचा निर्धार आपल्याला करायचा आहे. साहेबांच्या कार्यकर्त्यांचा मेळावा हा न भूतो न भविष्यती होणार आहे. तरी बीड मतदार संघांतील तथा रायमोहा जिल्हा परिषद सर्कल मधील शेतकरी कष्टकरी सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील विशेष करून युवा पिढीने मोठ्या संख्येने या मेळाव्याला उपस्थित राहावे अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.साहेबांचा कार्यकर्ता मेळावा हा बीड मतदारसंघातून लोकनेते जयदत्त अण्णा क्षीरसागर यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा संकल्प करण्यात येणार आहे. म्हणून हा मेळावा निर्णायक होणार आहे. तरी लोकनेते जयदत्त अण्णा क्षीरसागर यांचे विचार ऐकण्यासाठी कार्यकर्ता मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सौ महानंदा भारत बहिर यांनी केले आहे

## बीड शहरात चोरांचा सुळसुळाट अंकुश नगर,कालिका नगर,या भागात गस्त वाढवावी, येथील नागरिकांची मागणी

**बीड/प्रतिनिधी**

_बीड शहरांमध्ये मागील सात ते आठ दिवसांमध्ये चोरीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे बंद असलेली घरे मुख्यतः चोरांच्या रडावारावर असतात माणसांना बांधून दरोडा टाकतात कोणाचीही भीती न बाळगता बिनधास्त चोऱ्या करत




असून पोलीस प्रशासन यांची कसल्याही प्रकारची भीती न बाळगता चोऱ्या होत असून शहरातील अंकुश नगर कालिका नगर लोकाशा नगर या भागामधील नागरिक भयभीत असून रात्रभर स्वतः जागून भीतीमुळे काढत आहेत असे अतिरेक पोलीस अधीक्षक साहेब यांची भेट घेऊन या भागातील नागरिक सोबत घेऊन निवेदन देण्यात आले रात्रीची गस्त वाढवावी आणि नागरिकांना भयमुक्त करावे यावेळी अंकुश नगर, कालिका नगर, लोकाशा नगर, या भागातील नागरिक कांच्या 100 ते 150 सह्या असलेले निवेदन देण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते



लोकनेते स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांचे खंदे समर्थक तथा आदरणीय ताई साहेबांचे विश्वासू शिवसंग्राम नेते पांडुरंग बहिर यांना वाढदिवसानिमित्त शिवसंग्राम भवन येथे शुभेच्छा देण्यात आल्या.याप्रसंगी शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर आप्पा कोलंगडे, जिल्हा सरचिटणीस तथा शहर प्रभारी अनिल भाऊ घुमरे, बीड तालुका अध्यक्ष नवनाथ प्रभाळे, बीड शहराध्यक्ष सुहास आबा पाटील, बाजार समितीचे संचालक पंडित माने, प्रसिद्धीप्रमुख मनोज जाधव, शिरूर कासारचे तालुका उपाध्यक्ष नामदेव धांडे, उप सरपंच सिताराम बापू घुमरे, शिवसंग्राम नेते संदीप नवले, हरिभाऊ भोसले व अन्य शिवसंग्राम पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाटोदा शहरातील हजरत राज मोहम्मद चौकाला आले तलावाचे स्वरूप सिमेंट रस्ता व भुयारी नालीचे काम करा नसता आंदोलन-राहुल जाधव



**प्रतिनिधी/पाटोदा**

पाटोदा शहरातील मुख्य प्रवेशद्वार पैठण-पंढरपूर तसेच जामखेड - पाटोदा जाणारे राष्ट्रीय महामार्ग आहे. या ठिकाणी पैठण - पंढरपूर अर्धवट काम झाल्याने नागरिकांना व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सिमेंट रस्ता व भुयारी नालीचे तात्काळ कम करा नसता आंदोलन करण्यात येईल असे इशारा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली आहे.

पाटोदा शहरातील मुख्य प्रवेशद्वार हजरत राज मोहम्मद चौकात पहिल्याच पाऊसात तलावाचे स्वरुप आले होते. यामुळे नागरिकांना व प्रवाशांना नाहक येथे सतत त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे येथील तात्काळ रस्त्याचे व भुयारी गटार चे काम करुन नागरिकांना या त्रासापासून सुटका करावी नसता येथील नागरिकांच्या माध्यमातून आंदोलन करण्याचा इशारा देत आहे. पैठण - पंढरपूर /जामखेड-पाटोदा या राष्ट्रीय महामार्गावरील हजरत राजमोहम्मद चौक रस्त्यावर पाणी जमा होवू लागले. या ठिकाणी तलावाचे स्वरुप निर्माण झाल्याने वाहतूकीला अडथळा निर्माण होवू लागला. त्यामुळे ग्रामस्थांना व प्रवाशांना त्रास होत आहे. याची दखल पाटोदा नगरपंचायत व राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांनी घेऊन ज्याठिकाणी पाणी जमा होते त्याठिकाणी .सिमेंट रस्ता व भूयारी नाली काढण्यात यावी नसता येथील नागरिकांच्या माध्यमातून आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

कविता

## मामाच्या मळ्यात

मामाच्या मळ्यात रानमेवा
हवा तेवढा खुशाल खावा
सावलीसाठी वडाच झाड
आंब्यावरून काढू पाड

पिकली चिंच आंबट-गोड
तरीही खायची पेरूची फोड
करवंदाची पिकली जाळी
हळूच तोडा काळी काळी

झाडावरती खुशाल चढा
पिकलं जांभूळ हळूच काढा
पिकला चिकू गोड भारी
तोडून थोडे न्यायचे घरी

बोरं पिकली खिसे भरा
बोचतील काटे जपून जरा
ऊन होता झाडाखाली
गार गार सुखद सावली

मोठा धपकन आवाज करून
नारळ पडेल झाडावरून
असा माझ्या मामाचा मळा
याल का सांगा एक वेळा

---------------------------------------

सचिन बेंडभर
पिंपळे जगताप, पो- करंदी
ता- शिरूर जि- पुणे 412208.
Mob- 9822999306
Mail- sachinbendbhar3@gmail.com□

# मातृत्व,कर्तृत्त्व ,नेतृत्व आणि दातृत्व यां सर्व गुणांची खाण संत ज्ञानेश्वर दादा माऊली - महंत लक्ष्मण महाराज मेंगडे

## श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे पहिलाच दिवशी कीर्तनास गर्दी



**बीड प्रतिनिधी**

बीड - दि १५ मातृत्व, कर्तृत्त्व , नेतृत्व आणि दातृत्व यां सर्व गुणांची खाण संत ज्ञानेश्वर दादा माऊली होतें. आळंदीच्या संत ज्ञानेश्वर माऊली प्रमाणे दादा माऊलींचा आशीर्वाद सर्वांवर सारखा होता असे प्रतिपादन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले.. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे चोविसाव्या पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प गुंतताना ते बोलत होते... यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महादेव महाराज चाकरवाडीकर, श्री ह भ प नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, मृदंग महामेरू राम महाराज काजळे,श्री ह भ प नाना महाराज कदम श्री ह भ प किसन महाराज पवार श्री ह भ प सुरेश महाराज जाधव श्री ह भ प हरी किसन महाराज देवकर, डॉ.राजेंद्र वीर, नानासाहेब काकडे पाटील, यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत होती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या 24 व्या पुण्यतिथी सोहळ्यात पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुंपताना महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी संत तुकाराम महाराज यांच्या नाम संकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची । न लगती सायास जावे व नंतर वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ॥धृ॥ ठाईच बैसोनी करा एक चित्त । आवडी अनंत आळवावा ॥१॥ रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्व काळ ॥२॥ तुका म्हणे सोपे आहे सर्वाहूनी । शहाणा तो धनी येतो तेथे ॥३॥ यां अभंगावर सुंदर चिंतन मांडले. दादा माऊलींचे जीवन हे परमार्थिक साधकांसाठी आदर्श होते नामस्मरण आवर्ती श्रद्धा आणि निष्ठा होती तसेच त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक भाविकांना तेवढेच प्रेम ते द्यायचे त्यांच्या अनेक चमत्कार आणि आठवणी आज ही लोका मध्ये सर्वश्रुत आहेत.. बंकट स्वामी महाराज संस्थान आणि श्रीक्षेत्र चाकरवाडी यांचे घनिष्ठ नाते आहे. दादा माऊलीचे जीवन दातृत्व नेतृत्व ,कर्तृत्व आणि मातृत्व या गुणां ओतप्रोत भरलेले होते. किर्तन भजनातून ज्ञानदान आणि अन्नदानाच्या माध्यमातून लोकांना तृप्त केलें. दादा माऊलींचे नामस्मरणावरती खूप मोठे प्रेम होते. या दरबारात आल्यानंतर काही सांगण्यापेक्षा त्यांच्या चरणावरती माता ठेवण्यातच धन्यता आहे. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे आल्यानंतर नम्रता काय असते याचा मूर्तीमंत स्वरूप म्हणजे दादा माऊली होतें. अध्यात्मातील अनेकांना नम्र कसं व्हायचं हे माऊलींनी शिकवलं.. ते योग भ्रष्ट पुरुष होते. माऊलींच्या वर्णन करताना संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरीतील ओवी आता दयाते ऐसी! पुर्ण चंद्रिका जैसी!! निववीता न कळसी ! साना थोर!! पहिल्या दिवशी मंगल करावे लागते संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी मध्ये मंगल केले तर चांगदेव पासष्टी मध्येही आशीर्वादाने मंगल पाहायला मिळते.. देवाचे नाव मंगल आहे सकळ मंगळनिधी! श्री विठ्ठलाचे नाम आधी!! असा दाखला महाराजांनी दिला.. तसेच मंगलाचे प्रकार नामरूप मंगल, वस्तू निर्देशनात्मक मंगल , आशिर्वादात्मक मंगल याची उदाहरणही सांगितले.. नामसंकीर्तन आणि पापाची निवृत्ती होते त्यामुळे दुसऱ्या कुठल्याही साधनाची गरज नाही आणि ते साधन अतिशय सुलभ आहे असा अभंगाच्या पहिल्या चरणात तुकाराम महाराज सांगतात.. नामसंकीर्तन साधना करताना सायास, अट्टाहास किंवा वनात जाण्याची गरज नाही एका ठिकाणी बसूनही नामस्मरण करू शकतो.मात्र नामस्मरण करताना आवड असणे गरजेचे आहे.याच्यापेक्षा सोपं साधन काहीच नाही असं शपथ घेऊन तुकाराम महाराज या अभंगात सांगतात.. यावे कीर्तनासाठी साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंगाचार्य राम महाराज काजळे, श्री ह भ प, श्री ह भ प हरीकिसन देवकर श्री ह भ प संजय देवकर श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली आवटे ,श्री ह भ प बिभीषण महाराज कोकाट, अभिमान महाराज ढाकणे यांच्यासह माऊली फडावरील सर्व महाराष्ट्रातील नामांकित गायक वादक मंडळींची उपस्थिती होती.

# शाळेचा पहिला दिवस; स्कुल चले हम चिखल तुडवीत ; गुलाबपुष्प नको निदान धड चालता येईल असा रस्ता तरी द्या :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- जिल्ह्यातील सर्व शाळा आज दि.१५ जुन पासुन सुरु झाल्या आहेत.शाळेचा प्रारंभ हा चैतन्यमय व उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळावी यासाठी यासाठी शाळेमध्ये नव्याने प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच दिवशी स्वागत करण्यासाठी शिक्षण विभागाकडून मिठाई, पुष्पगुच्छ वाटपासह विविध उपक्रमांचे नियोजन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे. मात्र बीड तालुक्यातील कामखेडा गावातील शिंदेवस्तीवरील विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी चिखल तुडवीत शाळेत जावे लागत आहे. कामखेडा गावापासून अर्धा किलोमीटर अंतरावरील जवळपास ५० लोकसंख्या असलेल्या ग्रामस्थांनी रस्ता मिळावा यासाठी २-३ वर्षांपासून जिल्हा प्रशासन दरबारी निवेदने देऊन सुद्धा अद्याप



कोणतीही उपाययोजना न केल्याने एकंदरीतच शिक्षणाची केवळ कोट्यवधींचा खर्च करून जाहिरात बाजी करणा-या जिल्हा प्रशासनाला याचे गांभीर्य नसुन संबंधित प्रकरणात विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करून रस्त्यासाठी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी यांच्या मार्फत शिक्षणमंत्री, महिला व बाल कल्याण मंत्री, पालकमंत्री बीड यांना निवेदनाद्वारे केली आहे.

**पावसाळ्यात शेतातील कामं सोडून मुलांना शाळेपर्यंत सोडायला यावं लागतं :- स्वाती शिंदे (पालक)**

दरवर्षी पावसाळ्यात पाणंद रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पाणी साठते. जास्त पाऊस झाल्यास मुलांना शाळा बुडवावी लागते. पाण्यामुळे तसेच साप विंचु आदिमुळे मुलांना शाळेत जाताना भिती वाटते.दुपारी शेतातील कामं सोडून मुलांना घरी आणण्यासाठी यावं लागतं.आमच्या लेकरांच्या शिक्षणिसाठी शासनाने आमची रस्त्याची अडचण दुर करावी.

**शाळा प्रवेशोत्सव निमित्त भेटी देणारे उप शिक्षणाधिकारी माजेद काझी शिंदेवस्ती मुलांच्या व्यथा जाणून घेतली काय?? :- डॉ.गणेश ढवळे**

नविन शैक्षणिक वर्षाची सुरवात मोठ्या उत्साहात व आनंदाने करणे आवश्यक असुन शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करत विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी म्हणून विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प वाटपासह विविध उपक्रमांचे नियोजन करण्याच्या सुचना शिक्षण विभागाने दिलेल्या आहेत.या अनुषंगाने जिल्हा स्तरावरून तालुक्यांना भेटी देण्यासाठी आधिका-यांची नियुक्ती करण्यात आली असुन बीड तालुक्यासाठी उपशिक्षणाधिकारी माजेद काझी यांची निवड करण्यात आली असुन ते कामखेडा गावातील शिंदे वस्ती वरील विद्यार्थ्यांच्या व्यथा जाणून घेतील काय?? असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

# ग्रीन व्हॅली इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल प्रवेशा साठी पहिल्याच दिवशी पालकांचा स्फुर्त प्रतिसाद

## गुणवत्ता व दर्जेदार शिक्षण ग्रीन व्हॅली मिळते अशा पालकातून प्रतिक्रिया

**प्रतिनिधी/नांदेड**

नांदेडच्या नायगाव तालुक्यातील खैरगाव येथील ग्रीन व्हॅली इंटरनॅशनल स्कूल येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थी पालक प्रवेशासाठी मोठी गर्दी केली होती तर प्रवेश सुरुवातीच्या दिवशी प्रवेश गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वह्या आणि पुस्तक संस्थेच्या वतीने मोफत देण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष कुमुदकांत पटेल यांच्यावतीने विद्यार्थ्यांना




शालेय साहित्य नोटबुक बुक पेन व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार व स्वागत करून प्रवेश घेतला गेल्या अनेक वर्षापासून ची गुणवत्तेची उत्तम परंपरा असलेली व प्रशस्त इमारत भव्य क्रीडांगण विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष आरो वॉटर फिल्टर शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था 50 पेक्षा अधिक टीचर्स व कर्मचारी वृंद कमी बुद्ध्यांक असलेल्या विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष स्पर्धात्मक परीक्षेतून विद्यार्थी घडवण्याचे ध्येय संगीत व चित्रकला विषयक गोडी निर्माण करण्यासाठी विशेष शिक्षकाची नियुक्ती तालुक्यातील पालकांचा व विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद व प्रवेशासाठी मोठी गर्दी हनुमंत चंदनकर नांदेड नायगाव

# जिल्हा परिषदेच्या इयत्ता 10 वीच्या विद्यार्थ्यांचे 4 थे स्नेहमिलन संपन्न...



**प्रतिनिधी/केज** केज येथील जिल्हापरिषदेचे इयत्ता १० वीच्या सत १९९७ मधील विद्यार्थ्यांचे स्नेहमिलनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या बाबत सविस्तर वृत्त असे कि केज येथील जिल्हापरिषद शाळेमधील सन १९९७ चे इयत्ता १० वीतील विद्यार्थी प्रत्येक वर्षा प्रमाणे एकत्र येत स्नेहमिलाचा कार्यक्रम विविध ठिकाणी साजरा करतात . आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देतात त्याच प्रमाणे या वर्षी समर्थ हॉटेल येथे स्नेहमिलनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता . या कार्यक्रमास इंग्लिश या विषयाचे सेवानिवृत्त शिक्षक विठ्ठल जाधव सर तसेच मराठी विषयाचे नामदेवराव जाधव सर, प्रा.पवन सरवदे यांचा प्रथम: सत्कार करण्यात आला. तसेच १९९७ च्या बॅचमधील दयानंद सरवदे यांची राज्य मानवी हक्क आयोग येथे पोलीस निरीक्षक पी.आय.पदी मुंबई येथे बढती झाल्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला. यानंतर सेवानिवृत शिक्षक विठ्ठल जाधव सर व नामदेवराव जाधव सर यांनी तर विद्यार्थी दयानंद सरवदे ,उत्रेश्वर नेहरकर व गणेश चौधरी यांनी मार्गदर्शन केले. या स्नेहमिलनाच्या कार्यक्रमास आपल्या मित्रपरिवाला एकत्र करण्याचे कार्य कृष्णकांत देशमुख यांनी केले . सदरील स्नेहमिलनाच्या कार्यक्रमास गणेश चौधरी , उत्रेश्वर नेहरकर , बळीराम गायकवाड, शहनवाज इनामदार, शकील कादरी, ज्ञानेश्वर कदम , बाळु नायकवाडे , संतोष पवार , मुस्तफा , जमीर तांबोळी , गवळी प्रशांत , दिपक तपसे यासह अनेक विद्यार्थी या कार्यक्रमात उपस्थित होते.

# पँथर हरपला....! रिपाइंचे केज शहराध्यक्ष भास्कर मस्के यांचे निधन

**प्रतिनिधी/केज**

रिपब्लिकन पार्टी इंडियाचे केज शहराध्यक्ष भास्कर किसन मस्के (वय ६५) यांचे न्यूमोनियाच्या आजाराने शनिवारी (दि. १५) पहाटे २.३० वा.च्या सुमारास अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात निधन झाले. पँथर चळवळीतील एका सच्चा कार्यकर्त्याच्या अचानक जाण्याने चळवळीला एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. केज शहरातील फुले नगर भागातील भास्कर मस्के हे अत्यंत सामान्य, गरीब



परिवारातील श्रीमंत आंबेडकरी विचारांचा कडवट कार्यकर्ता होता. शिक्षण कमी असले तरी चळवळीशी जोडलेला सच्चा कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. प्रत्येक सामाजिक प्रश्नावरील मोर्चे व इतर आंदोलनात त्यांचा सहभाग असायचा. गोरगरिबांच्या मदतीला धावून जात होते. उदर निर्वाहासाठी त्यांनी मजुरी करून आपला स्वाभिमान कायम जपला होता. रिपाइंचे ते क्रियाशील पदाधिकारी होते. शनिवारी दुपारी बारा वाजता भिमनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, रमाकांत मुंडे, उत्तम मस्के, गोवर्धन वाघमारे, चंद्रकांत खरात, कपिल मस्के, दीपक कांबळे, भाई मोहन गुंड, गौतम बचुटे, महादेव गायकवाड यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन विवाहित मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# चौसाळा येथे सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब राऊत यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

**प्रतिनिधी/बीड** कायम गोरगरीब वंचित लोकांच्या सेवेत असलेले चौसाळा परिसरातील देवीबाभळगाव येथिल रहीवाशी व संत रोहीदास प्रतिष्ठानाचे अध्यक्ष बाळासाहेब राऊत यांचा वाढदिवस चौसाळा येथे विविध



सामाजिक उपक्रम राबवुन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.या सामाजिक उपक्रमामध्ये चौसाळा येथे रक्तदान शिबीर राबविण्यात आले या शिबिरामध्ये अनेकांनी रक्तदान केले या रक्तदान शिबिरावेळी प्रमुख उपस्थिती म्हणुन धर्मविर विलास(महाराज) शिंदे,बीड पंचायत समितीचे माजी सभापती काकासाहेब जोगदंड,कृषी उत्तपन्न बाजार समिती सभापती पुत्र वैभवजी मुळे पाटील,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर,कुणाल जाधव,गणेश(बापु) जोगदंड, विजय नवसेकर,पिन्नु(काका) शिंदे, पांडुरंग रामगुडे,सचिन रामगुडे,के,के,वडमारे,राजु राठोड,अभिजित रिटे,धर्मराज कांबळे,भारत सुरवसे,बबलु शिंदे यांच्यासह विविध राजकिय पक्षातील कार्यकर्त्यांनी या रक्तदान शिबिरास भेट देवुन सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब राऊत यांना शुभेच्छा दिल्या.

# बंडू निसर्गंध यांचा शेकडो कार्यकर्ते सह माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश

**बीड/प्रतिनिधी**

पेठ बीड विभागातील बंडू निसर्गंध यांनी माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून दिनांक १५ जून २०२४ रोजी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या उपस्थितीमध्ये शेकडो कार्यकर्त्यांसह जयदत्त अण्णा क्षीरसागर गटात प्रवेश केला या प्रवेश सोहळा वेळी कार्यकर्त्यांचा कार्यकर्ता होण्यापेक्षा यांनी हा प्रवेश केला यावेळी मोठ्या संख्येने बंडू निसर्गात यांचे समर्थक उपस्थित असल्याचे पहावयास मिळेल या प्रवेश सोहळ्यास मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी बंडू निसर्गंध यांनी मांडलेल्या प्रश्नावरही उत्तर देताना असे सांगितले की येणाऱ्या काळामध्ये पेड बीड भागातील विकासावर जास्तीत जास्त लक्ष देऊन विकास



करण्यात येईल बंडू निसर्गांत यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी प्रवेश केला यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मुखीद लाला, नाना मस्के, प्रमोद शिंदे, कपिल सोनवणे, सनी वाघमारे,लक्ष्मण (तात्या) मस्के,कल्याण डोंगरे,उत्तम सोनकांबळे, भैय्या साळवे, सुनील निसर्गंध विकी डोंगरे, महेश जाधव, रामा जाधव, सुनील बोचरे,सुधाकर नाईक,रवी शेळके, गणेश शेळके,अमित सपकाळ, भागवत जाधव, भागवत जाधव,शिवाजी जाधव, रमेश गाताडे, साळवे सर, सुदेश कांबळे,विशाल मस्के,विपुल मस्के, सौरभ धनवे,प्रतीक काकडे, कपिल इंकर, बाबासाहेब विणकर,आदित्य राठोड, प्रमोद जाधव,अशोक काकडे, गायके सर, शिवाजी मनोहर,सिद्धांत काकडे, कृष्णा काकडे, अनिल डोंगरे,पप्पू डोंगरे, संतोष सोनकांबळे, जितेश धनवे, प्रताप धनवे, आकाश खेमाडे, नितीन कांबळे,प्रेम निसर्गानं,शुभम धनवे,नारायण गुंजाळ,महादेव गुंजाळ,दत्ता गुंजाळ,मुन्ना धनवे, बंटी भोले इत्यादी उपस्थित होते.

## अंबाजोगाई येथील संगीन मज्जिद जमीन विक्री प्रकरणी मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे तक्रार!

# वफ्फ अधिकारी लक्ष देत नसल्याने वर्षाताई जगदाळे यांची थेट अल्पसंख्याक मंत्राकडे तक्रार!



**प्रतिनिधी/बीड**

अंबाजोगाई येथील संगीन मज्जिद इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री करणाऱ्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. बीड व छत्रपती संभाजी नगर तसेच मुंबई येथील वफ्फ कार्यालयात पुरावे सहित तक्रार करूनही अधिकारी लक्ष देत नसल्याने अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे अंबाजोगाई येथील प्रकरणाची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी तक्रार केली आहे. अंबाजोगाई येथील वफ्फ संस्था मज्जिद संगीन मौजे अंबाजोगाई यांची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र अनुक्रमांक एक पार्ट बी पान क्रमांक ६० व ६१ यामध्ये १९४७ पासून नोंद असून दर्गेचे सेवेसाठी एकुण १० सर्वे नंबर क्षेत्र २७६ एकर १८ गुंठे सेवेसाठी बहाल करण्यात आले होते. सदरील इनाम जमीन काही भूमाफियांनी संगणमत करत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या लाखो रुपयात खरेदी विक्री केलेली आहे. सदरील जमीन खरेदी विक्री प्रकरणी महाराष्ट्र निर्माण सेना मागील अनेक दिवसापासून पाठपुरावा करत आहे. या संदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ कार्यालयात संबंधित खरेदी विक्रीचे सर्व कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहे .या गंभीर बाबीची दखल छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ अधिकारी घेत नसल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे संगीन इनामी जमीन प्रकरणात थेट कारवाई करावी व संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली आहे.

# शाळेचा पहीला दिवस संविधानाची प्रस्तविकेची प्रत व गुलाब पुष्प देऊन देवून साजरा

**प्रतिनिधी/बीड**

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा आंतरवन पिंपरी तांडा वस्ती शाळा येथे कार्यक्रम साजरा करण्यात आला. शाळेच्या पहिल्या दिवशी बालकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता पहिला दिवस असल्यामुळे थोडे लाजरे बुजरे व भीत भीत येणारे विद्यार्थी या सर्व मुला मुलींना गुलाब पुष्प आणि संविधानाची प्रस्ताविकेची प्रत देवुन अगळं वेगळं स्वागत करण्यात आले



अशा आगळ्यावेगळ्या स्वागतामुळे बालक अगदी भारावून गेले राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड व बालकल्याण समिती बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांचा आगळावेगळा स्वागताचा कार्यक्रम या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते व संविधान फेलो तत्वशिल कांबळे, मिथून जोगदंड, बाल कल्याण समिती अध्यक्ष अशोक तांगडे, संस्थेच्या माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक डी. ए. शिंदे , उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य एम आर खंदारे खंदारे उपस्थित होते. संविधान आणि शिक्षण या दोन बाबी परस्पर पुरक आहेत. शिक्षण असेल तर संविधान कळेल. संविधान कळेल. संविधान समजले तर जगण्याच्या हक्का संबंधी जागृती येईल. त्यामुळे संविधान साक्षरता हा महत्वाचा विषय आहे तो विषय सर्वांनी समजून घेतला पाहीजे. असे विचार संविधान फेलो तत्वशिल कांबळे यांनी मार्गदर्शन करताना केले.

# तिरळे कुणबी समाजातील समाज बांधवांचा सत्कार सोहळा

मुकुटबन:- ग्रामीण भागातील प्रतिभावंत व गरजू विद्यार्थी नि प्रतिष्ठित व्यक्ती यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, त्यांच्यातील सुप्त गुणांचा विकास व्हावा, त्यांना पुढील आयुष्यासाठी प्रेरणा मिळावी आणि त्यांच्या हातून वैयक्तिकतेसोबतच समाजासाठी उत्तोमत्तम कार्य घडावे आणि समाजाचा विकासात्मक स्तर सुधारावा या उदात्त हेतुने तिरळे कुणबी (पाटील) समाज संघटनाद्वारा पुरस्कृत संत बाजीराव महाराज बहुउद्देशिय संस्था मुकुटबन तर्फे समाजातील प्रतिभावान विद्यार्थी व प्रतिष्ठित बांधवांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यात स्पर्धा परिक्षेतून नोकरी मिळवणा-या आणि सेवानिवृत्त, सद्यस्थितीत कार्यरत व सेवानिवृत्त पोलीस पाटील, वैद्यकिय व अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून नोकरी करणा-या, खाजगी शिक्षण संस्थेत व कंपनीमध्ये काम करणा-या तसेच १० वी व १२ वी मध्ये प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांचा सोमवार दि.१७ जून २०२४ रोजी महावीर भवन, मेन रोड मुकुटबन येथे सत्कार करण्यात येणार आहे.

# मीच मराठा आहे. माझ्याविरोधात मराठा का जाईल? काहीही होऊ शकतं: मंत्रीपदाच्या प्रश्नावर नारायण राणे यांचं विधान?

भाजपचे खासदार नारायण राणे यांना केंद्रात मंत्रीपद देण्यात आलं नाही. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. या मुद्द्यावर नारायण राणे यांना विचारण्यात आलं असता त्यांनी सूचक विधान केलं आहे. मी मंत्रिपदाच्या प्रश्नाला उत्तर देणार नाही. माझ्या हातातील हा प्रश्न नाहीये. हा वरिष्ठांचा प्रश्न आहे. कुणाला मंत्री करावं, कुणाला करू नये, कुणाला कधी मंत्री करावं हा वरिष्ठांचा निर्णय आहे. तसेच हा प्रश्न संपलेला नाही. केव्हाही काही होऊ शकतं. मी त्यावर भाष्य करणार नाही. पक्षाला महाराष्ट्र आणि कोकणासाठी काय निर्णय घ्यायचे आहेत ते घेतील, असं सूचक विधान नारायण राणे यांनी केलं आहे. भाजपचे खासदार नारायण राणे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन



निवडून दिल्याबद्दल जनतेचे आभार मानले. यावेळी त्यांनी सिंधुदुर्गाच्या विकासावर भर देणार असल्याचं स्पष्ट केलं. सिंधुदुर्गात नोकरीचा प्रश्न आहे. मी त्यावर काम करत आहे. जिल्ह्यात उद्योगधंदे आण्याचा प्रयत्न आहे. दोन वर्षात जिल्ह्यात उद्योगधंदे येतील. सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा आहे. या ठिकाणी पर्यटकांना पोषक वातावरण करणार आहे. हॉटेल व्यवसाय वाढावा, आलेल्या पर्यटकांना इथे आनंदाने दिवस घालवण्यासाठी मनोरंजनाची साधनं निर्माण करण्यावर माझा भर असणार आहे. शिवाय स्थानिकांचे दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे, असं नारायण राणे म्हणाले.

## मोठं कोण कसं ठरवणार?

आम्हीच मोठे भाऊ असल्याचा दावा शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी केला आहे. त्यावर त्यांना विचारण्यात आलं असता राणे यांनी आपल्या खास शैलीत उत्तर दिलं. संजय शिरसाट कोण आहेत? आमदार आहेत. अच्छा... अच्छा. कोण वैयक्तिक काय बोललं त्याला काही अर्थ नसतो. महायुती असल्याने सर्वांनी जबाबदारीने बोललं पाहिजे. इथे कोणी तराजू घेऊन बसलं नाही, मोठं कोण आणि लहान कोण करायला. मोठं कोण आहे? ते कशावर ठरवावं हे आधी ठरवा, असा टोला नारायण राणे यांनी लगावला.

# टांगमोडे हवालदार आला ..तुझ्या जीवाचा मैतर झाला.. अभिनेता रविशा तेलधुणे झळकणार खाकी.. लय भारी मध्ये




कवि सरकार इंगळी निर्माते ‘ लेखक दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांचा आगामी मराठी चित्रपट खाकी... लय भारी म्हणजेच देशाच्या दुश्मनासाठी लय... डेंजर या चित्रपटासाठी आता जवळपास सर्व स्टार कास्ट सिलेक्ट झाली असून या चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका निभावत आसलेले अभिनेता रविशा तेलधुणे सर यांच्यासाठी खास कॉमेडी धमाल मराठी साँग लिहिले आहे, सध्या तरी या साँग साठी... निर्माते - दिग्दर्शक पांडुरंग गोरे हिरोईन च्या शोधत लागले आहे, टांगमोडे हवालदार आला ...तुझ्या जिवाचा मैतर झाला.. हे साँग या मराठी चित्रपटात राहणार आहे, हे साँग सिने अभिनेता रविशा तेलधुणे यांच्यावर लवकरच चित्रित होणार आहे , या गाण्याचे गीतकार स्टोरी रायटर पांडुरंग गोरे असून हे साँग धमाल झाले आहे, या चित्रपटांमध्ये प्रमुख मार्गदर्शक संपादक श्री उद्धव फंगाळ सर , सुदामा संसारे सर व प्रसिद्ध कवी सरकार इंगळी अभिनेत्री रुतूजा आहेर ( पाटील ) प्रचिती चांदणे, गणेश मुंडे,उमेश वानखेडे सर पत्रकार, संजय लहासे, दिग्दर्शक पांडुरंग गोरे व अभिनेत्री प्रतीक्षा कुलथे यांची जोडी या चित्रपटांमध्ये धमाल करणार आहे , तर या चित्रपटांमध्ये मुख्य खलनायकची जबरदस्त भूमिका ... अभिनेता विलास पंडित, जितेंद्र चित्ते , निर्माते राजेंद्र पोपळघट सर, संजय लहासे ,रामदास राऊत, अभिनेता शिवराज सरनाईक, महेंद्र शिरसाठ, अमोल निकाळजे ,गजानन सुरडकर ,दत्ता गायकवाड ,पंकज कांबळेसर , इन्स्पेक्टर राजेश काळे , वजीर शेख , गोपाल वानखडे, राजू वावधनेसर , शोभा देशपांडे आशिष खांडवीकर, ऋतुजा पाटील ,शिल्पा पवार, विष्णू मिसाळ, शारदा गरूडे ,महेश वाधवाणी सर ,सुनील बोरकर, रफिक कुरेशी , समाधान वायदंडे अंबादास बटुळे , अशोक मोहिते सचिन लोखंडे,असलम रंगरेज, मफिज इनामदार , अभिनेता सुरज जाधव, मदन गायकवाड ,सरपंच दिलीप वनवे, अभिनेता जावेद सय्यद सर ,पुण्याचे प्रसिद्ध सिने अभिनेता भीमसेन चव्हाण सर यांची या चित्रपटांमध्ये खास खलनायक शैलीतील छकास...आमदाराची भूमिका आहे, असे दिग्गज सेलिब्रिटी कलाकार या चित्रपटामध्ये मुख्य भूमिकेत झळकणार आहे

# ऑल इंडिया पँथर सेनेमुळे महाविकास आघाडीचा राज्यात विजय झाला-दिपक केदार
## दलित, मुस्लिम, आदिवासी मतदारांनी राजकीय क्रांती केली.

**बीड प्रतिनिधी**

बीड ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी बीड दौ-यावर असताना पत्रकार परिषद घेऊन मत व्यक्त केले. यावेळी बोलताना या निवडणुकीत दलित, आदिवासी, मुस्लिम मतदारांनी संविधान वाचविण्याच्या बाजूने मतदान केले. महाराष्ट्रात दलित, मुस्लिम, आदिवासी, बहून घटकांसाठी लढणारी ऑल इंडिया पँथर सेना इंडिया आघाडी सोबत आल्यामुळे राज्यात महाविकास आघाडीचा विजय झाला आहे. भाजपने मत विभाजनाचे अनेक प्रयोग राबवले पण त्यांना हाणून पाडण्याचे काम आम्ही केले बीड लोकसभा उमेदवार बजरंग सोनावणे यांच्यासाठी आम्ही चार सभेला संबोधित केले, यात आष्टी, बीड, शिरूर, अंबाजोगाई समावेश आहे माझ्या सारख्या लढाऊ प्रामाणिक, स्वाभिमानी, कार्यकर्त्यांनी संविधान वाचवणे, दलित अत्याचार यावर घेतलेली भूमिकेला मतदाराने गांभीर्याने घेतले आहे आणि राजकीय क्रांती झाली ऑल इंडिया पँथर सेनेच्या जिल्हा अध्यक्ष व सर्व तालुका अध्यक्षांनी निस्वार्थ काम केले त्यांचे आम्ही स्वागत करतो. आज आम्ही संविधान वाचवू शकलो हे अभिमानाने सांगू शकतो, नरेंद्र मोदी संविधानाला नतमस्तक झाले हे क्रेडिट आमच्या भूमिकेचे आहे. राज्यात झालेल्या राजकीय क्रांतीचे आम्ही शिल्पकार आहोत. यापुढे भाजपाला छुप्या पद्धतीने मदत करणारे गट आमच्यापुढे टिकणार नाहीत. आम्ही जिकडे सत्ता तिकडे असेल, आंबेडकरी चळवळीने चौथ्या पर्वाचे नेतृत्व मान्य केले आहे हे या निवडणुकीतून सिद्ध झाले बीड जिल्ह्यातील जातीय दुराव्याचे वातावरण योग्य नाही महाराष्ट्राचा मणिपूर करण्याचा काही कर्मठ विघटनवादी विचारांचा अजेंडा आहे. आंबेडकरवादी आज मोठ्या भाऊ होऊन आवाहन करतोय की, सामाजिक सलोखा अबाधित ठेवा. गावगाड्यात आपला आर्थिक स्त्रोत ऐकमेकांशी आहे तो जपला पाहिजे तरुणांनी राजकीय प्रगल्भ झाले पाहिजे. सन्माननीय पंकजाताई मुंडे यांचा पराभव त्यांच्या भाजप नावाच्या पक्षांमुळे झाला त्या अपक्ष अस्त्या तर निवडून ही आल्या असत्या पण 400 पार चा नारा संविधान बदलून टाकण्यासाठी आहे हे भाजपाने पेरले त्यामुळे बीड नाही तर देशात याचा परिणाम झाला. स्मृती इराणी मराठा समाजामुळे पडलेली नाही. आयोधेत भाजपा पडली त्याला कारणीभूत मराठा नाही. देशव्यापी भाजप विरोधी लहर पंकजाताई यांच्या पराभवाचे कारण आहे त्यामुळे त्यांनी व्यक्तिगत हताश होऊ नये. अफवा, संभ्रम निर्माण करू नये. जातीमुळे पराभव झाला हे चुकीचे आहे. मुस्लिम, दलित, आदिवासी हे भाजप विरोधात होते त्याचा हा फटका आहे. येणाऱ्या विधानसभेला आम्ही मुख्य रोल मध्ये असणार आहोत. या निवडणुकीत अनेकांचे अस्तित्व संपले आहे. कितीही बाशिंग बांधून तयार केलं तरी आता अस्त झालेले उगवणार नाहीत. जिंकण्याचे राजकारण, सत्तेचे राजकारण आम्ही अंगीकारले आहे. अंबाजोगाई केज, उदगीर, मेहकर किंवा माळशिरस या राखीव मतदारसंघातील जागा ऑल इंडिया पँथर सेनेला महाविकास आघाडीने द्यावी अशी आमची रणनीती असेल. लवकरच राज्यव्यापी आधिवेशन घेऊन आम्ही भूमिका जाहीर असे मत राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी व्यक्त केले. यावेळी जिल्हा अध्यक्ष नितीन सोनावणे, वसीम शेख, विनोद कोरडे, विनोद वडमारे, वैभव चक्रे, सुर्यकांत ठोकळ, अनिल शेलार, आकाश ढोकणे व संघटनेतील कार्यकर्ते उपस्थित होते.

# कवी भारत झाडे अनंतात विलीन



कवी भारत झाडे चंद्रपूर हे १२ जूनला सकाळी ११ वाजताच्या सुमारास अनंतात विलीन झाले. ते जीवन गौरव साहित्य परिवारात अध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळत होते. मराठी साहित्याचे ते जाणते अभ्यासक होते. काही काळ त्यांनी महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी केली. २०१९ पासून कर्करोगाने ग्रस्त असल्याने दीर्घकाळ उपचारानंतर ते स्वर्गवासी झाले.

त्यांचा अलिकडे “जीवनार्थ” कवितासंग्रह प्रकाशित झाला असून महाराष्ट्रात त्यांचा शांत, संयमी व विनम्र स्वभावाने सर्वदूर परिचय होता.

त्यांच्या पश्चात दोन भाऊ- वहिणी, तीन बहिणी व आई-बाबा असा मोठा आप्त परिवार आहे.

# पैठण पंढरपूर रस्त्याची आमदार आजबेसह हायवेचे मुख्य अभियंता यांनी केली पाहणी

## लवकरच कामाला सुरुवात करू दिले आश्वासन...

**पाटोदा/प्रतिनिधी**

पैठण पंढरपूर या राजमार्गा वरील अपूर्ण राहिलेल्या कामाची पाहणी आमदार बाळासाहेब आजबे काका राष्ट्रीय महामार्ग मुंबई मुख्य अभियंता संतोष शेलार कार्यकारी अभियंता एस एम गलांडे वैशाली गाडेकर तसेच गुत्तेदार आगाव व मळेकर यांनी संयुक्तिकरित्या केली सदर काम हे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन पत्रकारानी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात हायवेचे मुख्य अभियंता संतोष शेलार यांनी दिले यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याचे अपूर्ण राहिलेले काम मार्गी लागेल अशी आशा व्यक्त केली जात आहे पैठण पंढरपूर या पालखी मार्गाचे अनेक ठिकाणचे काम येण्या अनेक वर्षापासून रखडलेले आहे त्यामुळे अनेक नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे सोबतच या अपूर्ण कामामुळे मोठे अपघात झालेली आहेत अनेक वेळा या संदर्भात मोठी आंदोलने केली मात्र कसल्याही प्रकारचे यावर ठोस अशी कारवाई झाली नाही गेल्या दोन वर्षापासून नागरिक या अपूर्ण असलेल्या कामामुळे त्रस्त झाले होते विशेष म्हणजे अनेक ठिकाणी हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे या कामाला मोठ्या भेगा पडल्यामुळे दुचाकी वाहनाच मोठे अपघात झालेली आहे विशेष म्हणजे पावसाळ्यात तर या अपूर्ण राहिलेल्या कामा मुळे रस्त्यावरून जाताना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागते अनेक वेळा या संबंधात तक्रारी करूनही संबंधित खात्याला जाग आली नाही शेवटी आमदार बाळासाहेब आजबे यांनी यासंदर्भात हायवेच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याशी वेळोवेळी संपर्क करून या संदर्भात पाठपुरावा केल्यामुळे शेवटी चीफ इंजिनियर तसेच कार्यकारी अभियंता गुत्तेदार या टीमने या कामाची पाहणी केली यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना चीफ इंजिनिअर संतोष शेलार यांनी उत्तर देताना सांगितले की या मार्गाचे काम काही तांत्रिक अडचणी व काही लोकांच्या असहकार्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेमुळे झाले नाही मात्र आता पूर्वी ज्या ठिकाणी जसा रस्ता होता त्याच प्रमाणे या रस्त्याचे काम पूर्णत्वास नेण्यात येईल असे सांगितले सर्व लोकांच्या सहकार्याने व पोलीस संरक्षणात या राहिलेले काम पूर्ण करू असे सांगितले यावेळी सदर कामांमध्ये काही ठिकाणी गुणवत्ता ढासळण्याचे कबुली देत त्या ठिकाणी पुन्हा हे काम



करण्याची सूचना गुत्तेदाराला त्यांनी यावेळी दिल्या यावेळी आमदार आजबे काका यांनी सुद्धा ज्या ठिकाणी अडचण निर्माण होईल त्या ठिकाणी आपण त्या अडचणीचे निराकरण करू मात्र काम त्वरित चालू करा अशी सूचना केली यावेळी आमदार सोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दीपक दादा घुमरे डॉक्टर कवठेकर बापासाहेब जाधव आदी सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते आमदार आजबे काका यांनी यासंदर्भात लक्ष घातल्यामुळे हे काम लवकरच पूर्णत्वास जाईल अशी आशा जनतेतून व्यक्त केली जात आह

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )